S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON · CENTRAL LIBRARY · YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 28/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 06**

# दिनविशेष



## कोकणचे साहित्यरत्न मधु मंगेश कर्णिक

मधु मंगेश कर्णिक हे प्रसिद्ध मराठी साहित्यिक आहेत. पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झालेल्या कर्णिकांनी गेल्या सहा-सात दशकात सातत्यपूर्ण लेखन करून साठोत्तरी कालखंडात स्वत:चे आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या समृद्ध आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्वाला अनेक पैलू आहेत. त्यांनी कथा, कादंबरी व ललितगद्य या वाङ्मयप्रकारात विपुल निर्मिती केली. याबरोबरच कविता, नाटक, चरित्र व आत्मचरित्र हे वाङ्मप्रकारही हाताळले. त्यांचे कथा आणि कादंबरी वाङ्मयप्रकारातील योगदान लक्षणीय आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध स्तरातील साहित्य आणि संस्कृती विषयक संस्थांवर त्यांनी सातत्याने आणि कृतिशील कार्य केले आहे. साहित्यनिर्मिती आणि साहित्यविषयक कार्यामुळे त्यांना बरीच लोकप्रियता लाभली आहे.

मधू मंगेश कर्णिक सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील करुळ गावचे. त्यांचे मूळ नाव आरस. कर्णिक ही त्यांच्या पूर्वजांना इंग्रजांनी दिलेली सनद. त्यावरून त्यांचे नाव कर्णिक पडले. अन्नपूर्णाबाई कर्णिक यांच्या पोटी मधु मंगेश कर्णिक यांचा जन्म २८ एप्रिल १९३१ रोजी झाला. त्यांचे वडील ब्रिटिशांच्या काळात खोत होते. ते सातव्या इयत्तेपर्यंत शिकले होते. मधु मंगेश कर्णिक चार वर्षाचे असताना त्यांचे वडील वारले. त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी आईचे निधन झाले. परिणामी त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागले. कर्णिक कुटुंबातील दहा अपत्यांपैकी मधु मंगेश कर्णिक नवव्या क्रमांकाचे होते. त्यांचे शालेय शिक्षण करूळ कणकवलीत झाले. कणकवली येथील माध्यमिक विद्यालयातून ते १९५१ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. कोकण मराठी साहित्य परिषदेची स्थापना ही मधु मंगेश कर्णिक यांच्या जीवनातील विशेष उपलब्धी मानली जाते.

Nashik Edition

Apr 28, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401